महाराष्ट्र पोलीस

क्र: आस्था-३(१)/पो.भ.-१९-आदेश-११/नियुक्ती/२०२३,
पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय,पुणे
दिनांक३१/०१/२०२३.
1-2-2023 / 882

संदर्भ:- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११.

विषय:- पोलीस भरती-२०१९.
पोलीस शिपाई पदावर स्थानिक व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत...

---ooo---

नियुक्ती आदेश :-

पुणे शहर पोलीस घटकांत रिक्त असलेल्या पोलीस शिपाई पदाकरीता पोलीस भरती प्रक्रिया २०१९ ही माहे ऑक्टोबर/२०२१ या कालावधीत पार पडली. सदर पोलीस भरती दरम्यान लेखी परीक्षा व मैदानी चाचणी मध्ये गुणानुक्रम, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमूद पुरुष उमेदवारांची पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेली आहे. तद्नंतर सदर उमेदवार वैद्यकिय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

त्याअनुषंगाने खालील उमेदवारांना पुणे शहर पोलीस घटकाचे आस्थापनेवर **"पोलीस शिपाई (गट-क)"** या संवर्गात सुधारीत वेतन मॅट्रीक्स मधील **वेतन स्तर एस-७ रुपये** २१७००-६९१००. व विशेष वेतन रु. ७५०/- (अधिक नियमानुसार वेतन व भत्ते) या वेतनावर पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे शहर येथे दिनांक- ०१/०२/२०२३ पासून खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून अस्थायी व **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती** करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नांव | लिंग | जात प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3752 | NILESH DASHRATH LIMHAN | MALE | OBC | OBC | SPORT |

अटी व शर्ती खालील प्रमाणे :-

१. सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील.
२. महाराष्ट्र शासन,सा.प्र.वि.,शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,दि.१२-१२-२०११ नुसार जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहुन निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यांत आलेली आहे.
३. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी संबंधीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहच पावतीची साक्षांकीत प्रत या कार्यालयास सादर करावी. संबंधीत जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात पडताळणीचे प्रस्ताव ६ महिन्याचे आंत निकाली काढणेबाबत मा. उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर तुम्हांस दिलेला नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यांत येईल व तुमच्या विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागास व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० यातील तरतूदीनुसार त्वरीत कारवाई करण्यांत येईल.
४. याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५-०८-२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यांत आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.
५. पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यांत चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकुल फेरअहवाल प्राप्त झाल्यास, संबंधीत उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. तसेच पोलीस पडताळणीत किंवा त्यानंतर केव्हाही आपली शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडपून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.
६. प्रशिक्षण कालावधीत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना दुखापत झाल्यास, त्याबद्दल ते कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.

७. प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांत दोन आठवड्यापेक्षा किंवा कायमची बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा -हास करणारे अशोभनियम कृत्य केल्यास,पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर राहील्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्व सूचना/नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यांत येईल.

८. पुणे शहर पोलीस घटकाचे आस्थापनेवर नियुक्ती दिल्यानंतर, बेशिस्त/गैरवर्तन किंवा गंभीर स्वरुपाची कसुरी निदर्शनास आल्यास, त्यांची या घटकाचे कार्यक्षेत्राबाहेर इतर कोणत्याही घटकांत कोठेही व केंव्हाही बदलीस पात्र होईल.

९. पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास, पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

१०. ज्या संवर्गातुन-जातीच्या प्रवर्गातुन पोलीस शिपाई पदी भरती झाली आहे तो संवर्ग /प्रवर्ग नंतर बदलता येणार नाही.

११. पोलीस शिपाई या पदावर रुजू झाल्या तारखेपासून तीन महिन्याचे आंत उमेदवारांने महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शा.नि. क्र.सीआर-१०७९/२०५९/२२३/११, दिनांक २०-११-१९८० नुसार विहीत केलेले भत्ते व दायित्व (Assets and Liabilities) बाबतचे विवरणपत्र स्वतःहुन भरुन संबंधीत आस्थापनेस सादर करणे बंधनकारक आहे.

१२. शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१-१०-२००५ अन्वये दिनांक १-नोव्हेंबर-२००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांना नविन परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना लागू ठरेल. सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्ती योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तीत्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना आपणांस लागू होणार नाही.

१३. शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्रक्र-१७/२०००/बारा, दिनांक २८/०३/२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील नियम ४ नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा आधिक असेल तर दिनांक २८-०३-२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे अनर्ह ठरविण्यांस पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

१४. महाराष्ट्र शासन,गृहविभाग पत्र क्र.पीएसबी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५अ, दिनांक २६-०९-२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांच्याकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि खर्च वसुली/२०१२/२२३१, दि.२६-०४-२०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायाने प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ३ वर्षात पोलीस शिपाई पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यांस विनंती केल्यास त्या उमेदवाराकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवाराने जितक्या महिने प्रशिक्षण घेतले आहे. त्या प्रशिक्षणा खर्च म्हणून प्रती महिना रुपये २०००/- (प्रती मासिक रुपये दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसुल करण्यांत येईल, व सदरची रोख रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यांत येईल. याबाबतचे हर्मीपत्र देणे आपणांस बंधनकारक आहे.

१५. पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली,१९५९ भाग-१ मधील नियम क्र.७८ (१) (V) ते (viii) अन्वये आपली सेवा केंव्हाही समाप्त करण्यांत येईल.

१६. पोलीस शिपाई पदासाठी शासनाने विहीत केलेले मुलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधीत पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पुर्ण करण्यांस टाळाटाळ केल्यास, पोलीस प्रशिक्षणांत/प्रशिक्षण पुर्ण करण्यांत स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणांस गैरहजर राहिल्यास/ भगोडा झाल्यास, महाराष्ट्र पोलीस नियमावली,१९९९ भाग-१ मधील नियम ७८ उपनियम (१) मधील VIII खालील टिप नुसार तुमची सेवा समाप्त ( Terminate from Service) करण्यांत येईल.

१७. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १२ अन्वये नवप्रविष्ट पोलीस शिपाई पदासाठी विहीत केलेले मुलभूत प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक राहील व सदर प्रशिक्षणांती घेण्यांत येणारी परीक्षा ०४ संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर ०४ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीमध्ये त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

१८. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम,२०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)नियम,२०११ या मुख्य नियमा मधील नियम-३(१)(क) नंतर उपखंड (ड) समाविष्ठ करण्यांत आलेला असून, त्यानुसार अन्य अर्हता म्हणून पोलीस भरती मध्ये पोलीस शिपाई पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम,१९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (L.M.V.) परवाना धारण करणे बंधनकारक राहील. परंतु, सदर परवाना धारण न करणा-या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत परवाना धारण करण्यात यावा. जर या कालावधीत हलकी वाहने चालविण्याचा परवाना धारण न केल्यास, पोलीस शिपाई पदासाठीची निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात यईल.

१९. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम,२०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)नियम,२०११ या मुख्य नियमा मधील नियम-१२ नंतर नियम १३ अंतर्भूत करण्यांत आलेला असून, त्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त

व्यक्तीने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यांत येणारे, संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

२०. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण-२०००/प्रक्र-६१/२००१/३९, दि. २०/०७/२००१ मधील तरतुदीनुसार नियुक्तीच्या दिनांकापासून ०१ वर्षाच्या आत संगणक हाताळणी/वापराबाबतचे शासन मान्य विहित प्रमाणपत्र सादर करावे. सदर विहित मुदतीत प्रमाणपत्र सादर न करणारा उमेदवार विहित प्रमाणपत्र सादर करेपर्यंत त्याची वेतनवाढ रोखण्यास पात्र राहिल.

२१. आपणांस महाराष्ट्र शासन नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

२२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १३ नुसार नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपायांना मुंबई पोलीस नियमावली,१९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम १९५६ व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागू होतील.

२३. उमेदवारांस कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल. तसे करणे बंधनकारक राहील.

२४. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यांनतर आपणांस पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी अर्ज करणेपूर्वी त्यांनी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२५. पोलीस महांसचालक,म.रा.मुंबई यांचेकडील अन्वयेचा क्र.पोमसं/६/१०/पो.शि.भरती/सेवाज्येष्ठता/२५१/२०१२,दिनांक १७/०८/२०१३ अन्वयेचा स्थायी आदेश क्र.२२/२०१३ मधील तरतुदीनुसार सेवाज्येष्ठता निश्चीत करण्यांत येईल.

२६. नियुक्ती आदेशातील जे उमेदवार सध्या शासकीय-निमशासकीय सेवेत कार्यरत आहेत, अशा उमेदवारांनी त्यांच्या सेवेचा राजीनामा मंजूरीबाबतचे आदेश व कार्यमुक्तीचे आदेश या कार्यालयास सादर केल्यानंतरच, त्यांना या आस्थापनेवर हजर करुन घेण्यांत येईल.

२७. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ मधील नियम ७४ नुसार नियुक्ती दिलेल्या महिला उमेदवार यांना कमीत कमी एक वर्षे सतत सेवा पुर्ण झाल्यानंतर प्रसूती रजेस पात्र राहतील.

२८. आपण समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्र/प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत संबंधीत विभागांकडून प्राप्त होणाऱ्या पडताळणी अहवालाचे अधिन राहून सदर नियुक्ती आदेश देण्यात येत आहे. आपण सादर केलेले समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र खोटे असल्याचे आढळुन आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

२९. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.,शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या.१२, दि.२८/०५/२०१८ व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील तरतूदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून ३० दिवसांचे आंत संबंधीत उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास, असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्ती आदेश रद्द करण्यांत येतील. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणा-या कारणाचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही. या नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.

(प्रेहिदास पवार)
पोलीस उप आयुक्त,मुख्यालय,
पुणे शहर.

प्रति :- संबंधीत उमेदवार यांस.
प्रत :- पुणे पोलीस नोटीस - प्रसिध्दीसाठी

<u>प्रत :- राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय, पुणे शहर.</u>

२/- सदरचे आदेश मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर त्वरीत डकविण्यात यावे. तसेच वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचा कर्तव्यावर हजर झाल्याचा दिनांक इकडील कार्यालयास कळविण्यात यावा. कर्तव्यावर हजर झालेनंतर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना किटपेटी व इतर सरकारी सरंजाम अदा करावा.